महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
दालन क्र. २२५, विस्तार इमारत, मंत्रालय, (विस्तार), मुंबई-४०००३२

क्रमांक:-झेरॉक्स-२०२४/प्र.क्र.०७/नो.शा. दिनांक:०७ जून.२०२४.

(दरपत्रकावावतची निविदा सूचना)

विषय : अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण (खुद्द) विभागासाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता एक हेवी ड्युप्लेक्स ड्यूटी झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्याबाबत.

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण (खुद्द) मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी एक झेरॉक्स मशिनचा एका वर्षाच्या कालावधीसाठी "प्रती प्रत दर (Per Copy Rate) या प्रमाणे भाडेतत्वावर स्थापित करावयाचे आहे. या करीता खाली नमुद अटी व शर्तीनुसार मोहोरबंद दरपत्रक मागविण्यास येत आहे.

२. या विभागाकडे दरपत्रक सादर करताना खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन दरपत्रक सादर करण्यात यावे :-

१. एक वर्षाच्या कालावधीकरिता प्रति मिनिट जास्तीत जास्त पाठपोट प्रती देणारी एक हेवी ड्युटी झेरॉक्स मशिन "प्रती प्रत दर तत्वावर (Per Copy Rate)" पुरावण्याबाबतचा करार करावा लागेल. अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण (खुद्द)) करिता मशिनचा वेग किमान ४० प्रती पर मिनिट ( ४५ PPM) इतका असावा व मशिनवर A४, A३ व लिगल साईज पेपरच्या झेरॉक्स प्रती काढता आल्या पाहिजेत.

२. पुरवठा करण्यात आलेली झेरॉक्स मशिन ही पूर्णत: कार्यक्षम आधुनिक डिजीटल मशिन असावी व तीन वर्षपेक्षा जास्त जुनीही नसावी. (खरेदी वर्ष, ब्रॅन्ड, मॉडेल व यंत्र क्रमांक, यंत्राच्या सुविधेसह (specifications) नमूद करावे.)

३. विभागास आवश्यकता भासल्यास याच निविदेतील अटी, शर्ती व दरानुसार अतिरिक्त झेरॉक्स मशीनचा पुरवठा करण्याची पुरवठेदाराची क्षमता असावी.

४. पुरवठादारास शासकीय कार्यालयास झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर देण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा व त्यांनी त्या प्रत्येक वर्षात किमान ५ शासकीय कार्यालयांना झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर दिलेली असावी, पुरवठादाराने शासकीय कार्यालयासोबत केलेल्या कराराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. तसेच पुरवठादारास शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने काळ्यायादीत टाकलेले नसावे.

५. मशिनच्या छपाईचा दर्जा उत्कृष्ट व टिकाऊ असणे आवश्यक आहे.

६. मशिनचे मासिक भाडे देण्यात येणार असून पुरवठादाराने प्रती प्रत दराने मशिन उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

७. दर सर्व करांसहीत (Including GST) आहे किंवा नाही हे स्पष्टपणे नमूद करावे.

८. विभागातर्फे फक्त मशिन ठेवण्यासाठी जागा, वीज, कागद व ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येईल.

९. मशिनच्या टोनरचा खर्च, दुरुस्तीच्या भागासह खर्च व आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे. त्याचे प्रदान विभागामार्फत केले जाणार नाही.

१०. पुरविण्यात आलेले झेरॉक्स मशिन बंद अथवा ना-दुरूस्त झाल्यास त्याबाबत विभागाने तक्रार केल्यापासून २४ तासात सेवा पुरविणे आवश्यक राहील. कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील करार अस्तित्वात येईपर्यन्त पुरवठादारामार्फत विभागामध्ये सन २०२४-२०२५ करिता स्विकृत केलेल्या दरानेच झेरॉक्स मशिन कार्यरत टेवण्यात येईल.

११. झेरॉक्स मशिनवर काढलेल्या प्रतीमहा प्रतींचे मशिनवरील मिटर रिडींग संबंधित अधिकारी/कर्मचा-यांसमक्ष प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस (१ तारखेस सुट्टी असल्यास त्याच्या दुस-या दिवशी) घेऊन ते त्यांच्याकडून प्रमाणित करून घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१२. कार्यालयीन भाडे तत्वावर झेरॉक्स मशिनचा पुरवठा केल्यानंतर कार्यालयीन कामकाजांच्या दिवशी मशिनवर काढलेल्या प्रतीबाबतचे देयक प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत विभागास सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. प्रत्येकवेळी देयकाची रक्कम स्विकारताना मुद्रांकित पावती या विभागाच्या रोख शाखेस देणे बंधनकारक राहील. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

१३ उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा दरकरार लागू करण्यात आल्यास, त्या दिवसापासून निविदाधारकाबरोबर केलेला दरकरार संपुष्टात येईल.

१४. एक वर्षाच्या कालावधीमध्ये झेरॉक्स मशीन भाडे तत्वावरील दरामध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झाल्यास पुरवठादाराने दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये त्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ करता येणार नाही.

१५. चालु वर्षीचा करार संपल्यानंतर पुढील वर्षासाठी दर करार प्रक्रिया पुर्ण होईपर्यन्त पुरवठादाराने मान्य केलेल्या दराने झेरॉक्स मशिन भाडे तत्वावर विभागास पुरविणे बंधनकारक राहील.

१६. या करारनाम्यातील अटी व शर्तीसंदर्भात काही प्रसंग उद्भवल्यास सदरहू वाद हा मा.प्रधान सचिव अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे सोपविण्यात येईल व त्यांनी दिलेला निर्णय अंतिमरित्या बंधनकारक राहील.

१२ स्वतंत्र पाकीटे बनवून एका मोहोरबंद लिफाफ्यात (१ Sealed Envelope) घालून या विभागातील अवर सचिव (नोंदणीशाखा), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,पोटमाळा, एम-२, विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,मुंबई-४०००३२" यांचेकडे दिनांक १८ जून, २०२४ पर्यत कार्यालयात सकाळी १०.०० ते दुपारी ४.३० पर्यंत) पाठवावेत, त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही.

वंदनासनगर

( वंदना सनगर )

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन